# सेंपरिट गुणवत्ता आणि सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण धोरणे

Quality Safety Health Environment

सर्व कर्मचाऱ्यांना आमच्या सेंपरिट एकत्रीत व्यवस्थापन प्रणाली पूर्ण करण्यात व त्याची देखभाल करण्यातील त्यांची भुमिका व जबाबदारी यांची जाणीव आहे याची आम्ही हमी देतो . आम्ही ज्या देशांमध्ये व्यवसाय करतो त्या देशांमधील लागू कायदेशीर आवश्यकता आणि इतर लागू असलेल्या आवश्यकतांचे पालन करणे आणि ओ एच आणि एस प्रकरणंवर आमच्या कर्मचाऱ्यांशी सल्लामसलत आणि सहभाग सूनिश्चित करण्यास आम्ही वचनबद्ध आहोत . सर्व कर्मचाऱ्यांना स्वयंप्रेरित काम करणे आणि शाश्वत सुधारणांच्या कामात व्यस्त ठेवणे आवश्यक आहे . सुधारणांसाठी आलेल्या सुचनांची कार्यक्षमता तपासली जाते आणि शक्य असेल तेथे वेगवान अंमलबजावणीसाठी श्रेय दिले जाते . आम्ही पुरेसा आणि योग्य जागतिक दर्जा अवलंबतो आणि ही उद्दिष्टे पुर्ण करण्यासाठी नीट विचार करून साधनसामुग्री पुरवतो . या धोरणांनुसार कंपनीची कामगिरी असल्याची आणि त्यांचे पालन होत असल्याचे पाहणे ही आमची जबाबदारी आहे .

ही धोरणे आमच्या कंपनीच्या संस्कृतीत आणि सहकारी मुल्यांमध्ये प्रतिबिंबित होतात . प्रत्येक काम दर्जेदार करणे आणि एसएचई विचारसरणीचा अवलंब करणे हा आमच्या उद्दिष्टांचा भाग असून आमची उद्दिष्टे ध्येयधोरणे निश्चित करण्यासाठी व सातत्यपूर्ण सुधारणा प्राप्त करण्यासाठी आखल्या जाणाऱ्या कार्यक्रमांचा पाया आहे . ही “जागतिक दर्जा उत्पादन” संकल्पना अंमलबजावणी आणि एकात्मतेसह प्रतिबिंबित करते, जे “शून्य एक सुंदर संख्या” आणि तत्वत: क्यूट्टएसएचइ च्या तत्वज्ञानाचे अनुसरण करीत आहे .

## गुणवत्ता

- आम्ही शक्य तितक्या कमीत कमी किमतीत “शून्य दोष विचारसरणी” वर आधारित उत्पादनांची निर्मिती करतो आणि आमच्या ग्राहकांच्या तसेच उत्पादनांच्या गरजांशी सुसंगत ठेवतो .
- आम्ही आमच्या ग्राहकांसाठी उत्पादन गुणवत्ता, तांत्रिक प्रगती आणि किंमत परिणामकारकता यांच्याबाबतीत दीर्घ कालीन विश्वासार्ह भागीदार आहोत .
- आम्ही आमच्या जबाबदाऱ्यांनुसार दिलेल्या कामाच्या दर्जा साठी जबाबदार आहोत! म्हणून, आम्ही लागू असलेल्या गरजा पूर्ण करण्याचे पालन करतो .
- आमचा विश्वास आहे कीं गुणवत्ता आमच्या प्रत्येक कामाचा अविभाज्य भाग आहे व राहील . संपूर्ण वेळ आणि कंपनीतील प्रत्येक कामाच्या जागेवर .

## सुरक्षा, आरोग्य आणि पर्यावरण (एसएचई)

- आम्ही असे अधोरेखित करतो की “शून्य घटना” प्राप्त करण्याकरीता कोणतेही काम इतके महत्वाचे असू शकत नाही जे सुरक्षा, आरोग्य व पर्यावरण यांच्या जोखमीवर असेल .
- आम्ही जास्तीत जास्त सुरक्षा धोके दूर करणे. आमचे कमचारीं, अभ्यागत,पुरवठादार कंत्राटदार आणि इतर प्रमुख भागधारक यांचे आरोग्य व कल्याण यांची काळजी ऊर्जा कायक्षमतेर्ला चालना आणि कायमस्वरूपी पयावरणार्चे संरक्षण यांच्यासाठी आराखडे तयार करून व्यवस्थापन करतो व प्रदूषण प्रतिबंधित करतो .
- आम्ही आताच्या आणि भविष्यातील कायासाठीर्चे धोके व परिणाम कमी करण्या करिता एसएचई घटक पाहून त्यांचे मूल्यमापन व व्यवस्थापन करतो आणि आम्ही आमच्या कमचाऱ्यांसार्ठी सामाजिक जबाबदारी घेतो .
- आमच्या उत्पादनांची रचना प्रक्रियांचा विकास प्रकल्प आणि सेवा या सर्वठिकाणी सर्व एसएचई घटकांना आमची कौशल्ये पणाला लावतो . आम्ही कोणत्याही आपत्कालीन घटना, दुघटर्ना आणि व्यवसायातील अडथळयांसाठी नियोजन करून, प्रतिसाद देतो आणि सर्व अडथळयांवर मात करतो . एसएचई बाबत कोणताही प्रश्न असल्यास त्याचा अभ्यास करून योग्य पद्धतीने प्रतिसाद देऊन कारवाई करतो .

आम्ही असे अधोरेखित करतो की “शून्य घटना” प्राप्त करण्याकरीता कोणतेही काम इतके महत्वाचे असू शकत नाही जे सुरक्षा, आरोग्य व पर्यावरण यांच्या जोखमीवर असेल . गुणवत्ता आणि एसएचई धोरणा प्रती व्यवस्थापकीय मंडळ आणि सर्व कर्मचारी पूर्णपणे कटिबद्ध आहेत व ज्यातून हे अधोरेखित होते की, सातत्यपूर्ण सुधारणेतूनच शाश्वत स्पर्धात्मकता आणि यशाची हमी प्राप्त होते!

व्यवस्थापकीय मंडळाकरीता
**Dr. Martin Füllenbach/CEO**

SEMPERIT